महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २६ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्य सहकारी संघाची निवडणूक सहकाराला दिशा देणारी ठरणार - आ. प्रवीण दरेकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्य सहकारी संघाची यंदाची निवडणूक राज्याच्या सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास भाजपा गटनेते व मुंबई बँकेचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर यांनी येथे कार्यकर्ता व मतदारांच्या मेळाव्यात व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक रविवारी 27 जुलै रोजी होत असून, 21 जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत आमदार प्रवीण दरेकर, संजीव कुसाळकर आणि शिवाजीराव नलावडे यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनलचे 9 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते व मतदारांना मार्गदर्शन करण्यासाठी कोहिनूर हॉल, दादर येथे आयोजित मेळाव्यात दरेकर बोलत होते.



या मेळाव्याला मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, राज्य संघाचे उमेदवार नंदकुमार काटकर, मुंबई हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, राज्य कंझ्युमर फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले, संचालिका जयश्री पांचाळ, शिल्पा सरपोतदार, मुंबई सह. बोर्डाचे अध्यक्ष अनिल गजरे, म्युनिसिपल को-ऑप बँकेचे सर्वेसर्वा विष्णू घुमरे, आनंदराव गोळे यांसह मोठ्या संख्येने सहकारातील कार्यकर्ते, मतदार उपस्थित होते.

महाराष्ट्र सहकारी संघाला 106 वर्षांची परंपरा आहे. या संघाची स्थापना महात्मा गांधींनी केली. वसंतदादा पाटील ते गुलाबराव पाटील यांच्यासारखे अनेक दिग्गज नेते संघाचे अध्यक्ष झाले; परंतु संघाची अवस्था अतिशय बिकट असून तोट्यात असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांनी एकत्र येऊन ही निवडणूक लढण्यास सांगितले. परिणामी, महाराष्ट्रातील वातावरण बदलले आणि ही निवडणूक आता केवळ सोपस्कार राहिला आहे. ही निवडणूक राज्य संघ कोण जिंकणार? कोण अध्यक्ष होणार? यापेक्षा राज्यातील सहकाराला नवीन दिशा देणारी ठरणार आहे, असे दरेकर म्हणाले.

राज्य आणि केंद्र सरकारही सहकाराच्या पाठीशी आहे

राज्याचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सहकारासाठी चांगल्या गोष्टी करून घेऊ. उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे पाठीशी आहेत. केंद्रात कधीच सहकार खाते नव्हते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ते निर्माण केले व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे त्या खात्याची जबाबदारी सोपवली. देशात सहकाराला ताकद देण्याचे काम होत आहे. केंद्राचे सहकार धोरण तयार होणार आहे. ज्यावेळी आपल्या संस्था भक्कम असतील, तेव्हा सरकारला सांगू खासगी बँकांच्या तोडीस तोड आमच्या सहकार संस्था आहेत. आपले प्रेम आणि आशीर्वाद पाठीशी असू द्या. सर्व गोष्टी करून दाखवायची धमक नक्की आहे. येणाऱ्या काळात ती दिसून येईल, असा विश्वासही दरेकरांनी उपस्थितांना दिला.

राज्य संघाच्या माध्यमातून संघाला दिशा देणार आहोत. शिक्षण-प्रशिक्षण निधी पूर्ववत प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करू. बदल करून खरे प्रशिक्षण द्यायचे आहे. अडचणीतील संघाला पुन्हा वैभवशाली दिवस आणण्याचे आम्ही ठरवले असून ते करून दाखवू. मुंबई बँकेला सतराशे कोटींवरून पंधरा हजार कोटींवर नेले. आमच्यावर टीका झाल्या, पण डगमगलो नाही. कारण मुंबईतील संस्थांचा आमच्यावर विश्वास होता. रायगड बँक अडचणीत होती, तिला बाहेर काढले. बंद पडलेल्या संस्था जगल्या पाहिजेत ही भूमिका घेऊन आम्ही काम करतोय.



- प्रविण दरेकर

थोडक्यात महत्वाचे

## ठाण्यात दोन ठिकाणी भिंती कोसळल्या

### जीवितहानी नाही- तातडीने आपत्ती व्यवस्थापन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : गेल्या काही दिवसांपासून ठाणे शहरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. जोरदार पावसामुळे शहरातील दोन भागांमध्ये गुरूवारी आणि शुक्रवारी संरक्षण भिंत कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. यात गुरुवारी रात्री कळवा परिसरातील सोसायटीची संरक्षण भिंत कोसळली तसेच शुक्रवारी दुपारी पोखरण रोड क्रमांक १ येथील वनविभागाची भिंत कोसळल्याची घटना उघडकीस आली आहे. सुदैवाने या दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून तातडीने कार्यवाही करण्यात आली आहे.

ठाणे शहरातील कळवा येथील गणपतीपाडा परिसरात गुरुवारी सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास ओम गणेश सोसायटीची संरक्षण भिंत कोसळल्याची घटना घडली. ही भिंत अंदाजे १५ फूट लांब व ५ फूट उंच होती. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. ही घटना घडताच कळवा प्रभाग समिती निहाय आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात धोकापट्टी लावण्यात आले असून संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



## डोळखांब परिसरात बिबट्याचा वावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहापूर तालुक्यातील सह्याद्री रांग पर्वत हद्दीतील डोळखांब वनपरिक्षेत्र हद्दीतील साकडबाव, खराडे, चांग्याचापाडा, कथोरेपाडा भागात बिबट्याचा वावर दिसून आला आहे. बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने भक्ष्याचा माग काढत कथोरे पाड्यात प्रवेश केला. श्वानाची शिकार करण्याचा बिबट्याचा बेत असावा. पण गावात बिबट्याने प्रवेश करताच गावातील श्वानांनी एकाचवेळी मोठ्याने भुंकणे सुरू करून बिबट्यापासून स्वसंरक्षणासाठी पळ काढला.

श्वानांचा माग काढत बिबट्या कथोरे पाड्यातील विविध रस्त्यांवरून घरांच्या आडोशाने कुंपणावरून उड्या मारत फिरत होता. कथोरा पाडा येथील रवींद्र कथोरे यांच्या घरासमोर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. सकाळी उठल्यानंतर नेहमीप्रमाणे रवींद्र कथोरे यांनी सीसीटीव्ही चित्रण तपासले. त्यावेळी त्यांना मध्यरात्रीच्या सुमारास श्वान भुंकत होते. त्यावेळी बिबट्या आपल्या घरासमोरील अंगणात आले असल्याचे आढळले.

साकडबाव, कथोरे पाडा परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे समजल्यावर कथोरे यांनी ही माहिती डोळखांब वनपरिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल अजय चव्हाण यांना दिली. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ नागरिकांच्या जागृततेसाठी बिबट्यापासून स्वसंरक्षण कसे करावे, रात्रीच्या वेळेत बिबट्याने गावात प्रवेश केला तर घ्यावयाची काळजी. गाई, म्हशी, शेळया यांच्या सुरक्षिततेसाठी हे गोधन बांधलेल्या गोठ्याचे दरवाजे रात्रीच्या वेळेत बंदिस्त करावेत. सकाळच्या वेळेत गोधन जंगलात चरायला नेताना गटाने जाणे. संध्याकाळी उशिरापर्यंत जंगलात गोधन चारण्यासाठी न थांबणे, जंगलात गोधन चारत असताना अचानक बिबट्या दिसल्या तर घ्यावयाची काळजी याविषयीचे प्रबोधन सुरू केले आहे.

## शहापूर तालुक्यात भाजपची संघटनात्मक रचना ‘डिजिटल’

### मंडळाध्यक्षांना अत्याधुनिक ’टॅब’

शहापूर, ता. २४ (बातमीदार):

आगामी ठाणे जिल्हा परिषद, शहापूर पंचायत समिती आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीच भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक पातळीवर एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शहापूर तालुक्यातील भाजपच्या तीन मंडळाध्यक्षांना अत्याधुनिक 'टॅब' वितरित करून पक्षाने ग्रामीण भागातील कामकाज अधिक कार्यक्षम व डिजिटल बनवण्याची दिशा पकडली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातही पक्षाचे हायटेक स्वरूप पाहायला मिळत आहे.

पूर्वी फॅक्स व ई-मेलच्या माध्यमातून पाठवली जाणारी माहिती, आता मंडळाध्यक्ष थेट कार्यक्रमाच्या ठिकाणाहून ऑनलाइन पद्धतीने प्रदेश कार्यालयाला पाठवू शकणार आहेत. यात मंडळातील सदस्य संख्या, पक्षाच्या कार्यक्रम, भागधारकांची माहिती यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे भाजपचे संघटनात्मक कामकाज आता एका क्लिकवर अधिक गतिमान आणि पारदर्शक होणार आहे. भाजपने पदाधिकाऱ्यांच्या हाती टॅब देऊन त्यांना हायटेक बनविल्याने पक्षाचे ग्रामीण भागातील कार्यकर्ते टॅबस्नेही बनले आहेत.

प्रत्येक मंडळाध्यक्षांच्या हातात भाजपने अत्याधुनिक "टॅब" दिला आहे. शहापूर तालुक्यातील तीन मंडळाध्यक्षांना टॅब दिला असून, त्याद्वारे मंडळातील माहिती, तसेच पक्षाच्या विविध कार्यक्रमांतील माहिती त्याच ठिकाणाहून प्रदेशला सादर करावी लागणार आहे. या बदलामुळे पक्षाच्या गतिमान कामकाजात सुधारणा होणार असून, भविष्यात मिळालेली माहिती निवडणूक रणनीतीसाठी वापरली जाणार आहे. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदींची 'मन की बात' व अन्य राष्ट्रीय कार्यक्रमही मंडळाध्यक्ष टॅबवरून थेट पाहू शकतील. त्यामुळे वेळेची बचत व थेट संवाद साधण्याची क्षमता वाढणार आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संघटनात्मक कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी शहापूर तालुक्यातील पूर्व मंडळाध्यक्ष सुभाष हरड, दक्षिण मंडळाध्यक्ष दीपक बोंबे आणि उत्तर मंडळाध्यक्ष प्रकाश सांडे अशा तिघांना हे टॅब दिले आहेत. पक्षाचे विविध ॲप या टॅबमध्ये असणार आहेत.

## राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यात पुढील 24 तासांसाठी रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय, पुणे घाट आणि सातारा घाट परिसरातही रेड अलर्ट देण्यात आला असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिली आहे. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा, आणि तानसा या धरणांमधून अनुक्रमे 4488.25 क्युसेक्स, 2012.67 क्युसेक्स आणि 3315.25 क्युसेक्स इतका विसर्ग सुरू आहे. आपत्तीच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## मुंबई - ठाण्याला पावसाने झोडपले

### उपनगरीय लोकलसेवा विस्कळीत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गेल्या दोन दिवसांपासून राज्यभरात पावसाची तुफान बॅटिंग सुरु आहे. मुंबई शहरासह उपनगरात देखील पावसाच्या संततधार कोसळत आहेत. यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले असून मुंबईकरांचे हाल होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाणाऱ्या लोकलसेवेलाही मुसळधार पावसाचा फटका बसला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुसळधार पावसामुळे लोकल ट्रेनची वाहतूक विस्कळीत झाली आहे. पश्चिम, हार्बर आणि मध्य रेल्वे मार्गावर रेल्वे वाहतूक उशिराने सुरु आहेत. मुख्य मार्गावरील लोकल ट्रेन १० ते १२ मिनिटे उशिराने आणि हार्बर मार्गावरील लोकल सात ते आठ मिनिटे उशिराने सुरू आहेत. खबरदारी आणि कमी दृश्यमानता यामुळे गाड्या मंद गतीने धावत आहेत, अशी माहिती समोर आली आहे.

रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुसळधार पावसामुळे लोकल ट्रेनची वाहतूक विस्कळीत झाली आहे. पश्चिम, हार्बर आणि मध्य रेल्वे मार्गावर रेल्वे वाहतूक उशिराने सुरु आहेत. मुख्य मार्गावरील लोकल ट्रेन १० ते १२ मिनिटे उशिराने आणि हार्बर मार्गावरील लोकल सात ते आठ मिनिटे उशिराने सुरू आहेत. खबरदारी आणि कमी दृश्यमानता यामुळे गाड्या मंद गतीने धावत आहेत, अशी माहिती समोर आली आहे.

## विद्यार्थी गुणगौरव आणि ग्रामीण भागाचा दौरा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा वाढदिवस साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आपला वाढदिवस फाईव्ह स्ट्रार किंवा इतर पंचतारांकित हॉटेल साजरा न करता शहापूर तालुक्यातील अतिदुर्गम अशा रस्ता नसलेल्या दापूर माळ या गावास तब्बल६ते७किलोमीटर अंतर पायी चालत जाऊन विद्यार्थ्यांसोबत साजरा तर केलाच शिवाय या ठिकाणी रस्ता, अंगणवाडी, शाळा, घरकुल, पाणी योजना अशा मुलभूत सोईसुविधा देण्याचा निश्चय केला, त्यामुळे ही घटना ठाणे जिल्हा परिषदे समोर एक आदर्श ठरेल यात शंका च नाही.





ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी पदभार स्वीकारल्या पासून जिल्ह्यात अमुलाग्र बद्दल घडवून आणला आहे, शासनाच्या१००दिवसांच्या ७ कलमी कृती आराखडयाचे अंमलबजावणी जिल्ह्यात प्रभावी पणे केली आहे. त्यामुळे त्यांनी प्रशासनावर मजबूत पक्कड निर्माण केली आहे तिही प्रत्यक्ष कृती मधून, नुकतीच त्यांनी मुरबाड तालुक्यातील प-हे ग्रामपंचायतीला अर्धा ते पाऊण किमी अंतर बांधावरून चालत जाऊन भेट दिली व २ ग्रामसेवकांना निंलबित केले होते. हे ताजे असतानाचआज ठाणे सीईओ श्री घुगे यांचा वाढदिवस असूनही तो घरी, कार्यालय, हॉटेल किंवा इतर ठिकाणी साजरा न करता ते थेट शहापूर तालुक्याच्या दौऱ्यावर निघाले, अस्नोली येथील जिप शाळेच्या स्टॉप स्कॉलरशिपविद्यार्थ्यांना टेबल टेनिस देण्याचा जो शब्द दिला होता. तो त्यांनी पाळला व त्यांच्या सोबत आपला वाढदिवस साजरा केला.

## काळू नदीवरील रुंदे पूल पाण्याखाली



कल्याण तालुक्यातील काळू नदीवरील रुंदे पूल पाण्याखाली टिटवाळा फळेगाव खडवली रस्ता बंद.









# स्मार्ट सिटीचा बुरखा फाटला
# मासुंदा तलावाच्या कोट्यवधींच्या सुशोभीकरणाची दयनीय अवस्था

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोट्यवधी रुपयांचा खर्च, स्मार्ट सिटीच्या नावाखाली झगमगता प्रकल्प... पण प्रत्यक्षात? मासुंदा तलावाच्या काठावर उघडपणे दिसतेय निष्काळजीपणा, फसव्या दर्जाचे काम आणि ठाणे महानगर पालिका प्रशासनाच एक अवाक्षर काढत नाही. येथील लावलेल्या रेलिंग, काचेचा पदपथ, एल इ डी लाईट व्यवस्थांची दुरावस्था झाली असल्याचा आरोप ठाणे काँग्रेस पक्षाने केला आहे.

ठाणे शहराचा मानबिंदू म्हणून असलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागातील मासुंदा तलावावर काही वर्षांपूर्वी स्मार्ट सिटी अंतर्गत भव्य सुशोभीकरण करण्यात आलं. स्टील रेलिंग, एलईडी लाइटिंग, काचेचे पदपथ, बैठक व्यवस्था अशा 'हाय-फाय' सोयीचा गाजावाजा झाला. पण आता, या सर्व सुविधांची झालीय धुळधाण.तुटलेली रेलिंग, फुटलेल्या काचा, उखडलेले पदपथ, मोडलेली बाकं ही सगळी दृश्यं आज नागरिकांच्या सुरक्षिततेवर गदा आणत आहेत. नागरिकांच्या वाढत्या तक्रारीनंतर ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान डोळ्यांत झणझणीत खुपणारी वस्तुस्थिती उघडकीस आली.काँग्रेसने स्वतःहून फुटलेल्या काचांजवळ सुरक्षा पट्ट्या लावत प्रशासनाला सतर्कतेचा इशारा दिला. पिंगळेंनी तत्काळ नगर अभियंत्यांशी संपर्क साधत या ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली. स्मार्ट सिटीच्या नावाखाली झालेल्या सर्वच कामांची चौकशी व्हावी, अशी मागणीही काँग्रेसने यावेळी लावून धरली आहे. या पाहणी वेळी शिष्टमंडळात सेवादल अध्यक्ष रवींद्र कोळी, शहर उपाध्यक्ष बाबू यादव ,ब्लॉक अध्यक्ष निलेश पाटील,ब्लॉक कार्याध्यक्ष नूर्शिद शेख,युवक काँग्रेस चे लोकेश घोलप,अमोल गांगुर्डे, विलास महाडेश्वर यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

> **भ्रष्टाचाराचा आरोप करत 'स्मार्ट सिटी' की 'स्कॅम सिटी'? त्यावेळी भाजप नेत्यांनी दिल्लीपर्यंत धाव घेत सुशोभीकरणातील भ्रष्टाचाराचे बिंग फोडले होते. पण चौकशी कुठे गेली? निकाल काय लागला? हे नागरिकांना अजूनही माहित नाही. इतक्या लवकर जर ही दुरवस्था झाली असेल, तर हा थेट दर्जाहीन कामांचा, भ्रष्टाचाराचा पुरावा नाही का ?**
> **- राहुल पिंगळे (काँग्रेस प्रवक्ता)**

# युवा किर्तनकार उमेश गायकर यांनी जागवल्या
# कै.अश्विन भोईर यांच्या आठवणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'तो हसरा चेहरा, नाही कोणा दुखावले, मनाचा तो भोळेपणा, नाही केला मोठेपणा, सोडूनी गेला अचानक, नव्हती कोणाला याची जाण, पुन्हा परतूनी यावेस हाच आमचा बहुमान!

वरप येथील कै, अश्विन शरद भोईर यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमा निमित्त आयोजित कार्यक्रमात युवाकिर्तनकार हभप श्री उमेश महाराज गायकर यांनी मनुष्य जीवनावर सुश्राव्य किर्तन केल्यामुळे उपस्थित सर्वाच्याच कै. अश्विन च्या आठवणीने डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या.

मागील वर्षी म्हणजे रविवार दि ४/८/२०२४रोजी सांयकाळच्या सुमारास वरप गावच्या कु अश्विन(पप्या) भोईर,याचे माळशेज घाटात कार अपघातात दुर्दैवी निधन झाले होते, कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आरोग्य विभागात कार्यरत असणारे शरद काळुराम भोईर यांचा तो एकुलता एक मुलगा होता, तर काका अँड भरत भोईर याचा तो सर्वाधिक लाडका होता, घरातील सर्वांचा तो दादा, भाऊ, लोकप्रिय मित्र होता, अशा गुणवंत, व गुणवान मुलाचे असे अचानक निघून जाण्याने वरप गावावर शोककळा पसरली होती, त्याचे मामा शिवसेनेचे कल्याण शहर प्रमुख व नगरसेवक महेश गायकवाड, दुसरे उद्योजक व नगरसेवक मयूर पाटील, डॉ भगवान भोईर माझी सरपंच, अशा नामांकित कुंटूबातील तो असल्याने त्याच्या अंत्यसंस्कारावेळी मोठा जनसमुदाय जमला होता.



अशा या कै अश्विन शरद भोईर यांच्या पहिल्या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन आज करण्यात आले होते, त्यामध्ये हभप उमेश महाराज गायकर या जन्म मृत्यू, जीवन कसे जगावे, शरीराच्या विविध अवयवांचे कार्य कसे असावे हे संत तुकाराम महाराजांच्या अंभगासह, दृष्टांत, दाखले देऊन पटवून दिले, त्यांच्या सुश्राव्य किर्तनाणे उपस्थित कोणी ही जागेवरून उटले नाही, शेवटी त्यांनी कै अश्विन यांच्यावर गाणे म्हटल्यावर मात्र त्याचा काका अँड भरत भोईर, वडील शरद भोईर, आई अर्चना, बहिण ,सारीखा महेश गायकवाड,प्रगती माळी, साक्षी भोईर, अरुसी भोईर,आणि आजी आजोबा, राईबाई भोईर व काळुराम भोईर यांच्या सह उपस्थित सर्वांचे डोळे पाणावल्याचे दिसून आले.

या कार्यक्रमासाठी शिवसेना नेते व नगरसेवक मयूर पाटील, पंढरीनाथ गायकवाड, घनशाम गायकवाड ,प्रकाश गोंधळे,मधूकर पाटील, विशाल माळी, सोमनाथ भाग्यवंत,योगेश भोईर वरप ग्रामपंचायतीचे माझी उपसरपंच रामदास भोईर, सदस्य वासुदेव भोईर, अंकुश भोईर, संदिप पावशे, हरिश्चंद्र गायकर, अभिमन्यू भोईर,मोतीराम भोईर पत्रकार संजय कांबळे,आदी मंडळी उपस्थित होते.

## गीतासार



**अध्याय १७**
**श्रद्धात्रयविभागयोगः**

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपःक्रियाः । दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ॥ १७-२५ ॥

तत् या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या परमात्म्याचेच हे सर्व आहे, या भावनेने फळाची इच्छा न करता नाना प्रकारच्या यज्ञ, तप व दान रूप क्रिया कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषांकडून केल्या जातात. ॥ १७-२५ ॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते । प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ १७-२६ ॥

सत् या परमात्म्याच्या नावाचा सत्य भावात आणि श्रेष्ठ भावात प्रयोग केला जातो. तसेच हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), उत्तम कर्मातही सत् शब्द योजला जातो. ॥ १७-२६ ॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते । कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ १७-२७ ॥

तसेच यज्ञ, तप आणि दान यांमध्ये जी स्थिती अर्थात आस्तिक बुद्धी असते, तिलाही सत् असे म्हणतात आणि त्या परमात्म्यासाठी केलेले कर्म निश्चयाने सत् असे म्हटले जाते. ॥ १७-२७ ॥

# ह.भ.प. कै. केशव जागरे यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : दिवसेंदिवस वाढत असलेली वृक्षतोड,पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास व ग्लोबल वार्मिंगमुळे वाढत असलेले तापमान हे वातावरण बदलायला हवे हा उदात्त हेतू समोर ठेवून आपले सामाजिक दायित्व निभावण्याच्या दृष्टीने शहापूर तालुक्यातील नडगाव येथील जागरे कुटुंबाच्या वतीने शहापूर तालुका एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष ह.भ.प. कै. पांडुरंग जागरे यांच्या जयंतीनिमित्त व ह.भ.प. कै. केशव जागरे यांच्या स्मरणार्थ वृक्षरोपण व वृक्षवाटप कार्यक्रम दहिवली विभाग माध्यमिक विद्यालयायात संपन्न झाला.

दरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीसह त्यांचे संवर्धन करण्याचे धडे देण्यात आले.यावेळी हभप पांडुरंग जागरे व ह.भ.प. कै. केशव जागरे यांच्या स्मृतींना उजाळा देत वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयीची जनजागृती करून वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला.तसेच विद्यार्थ्यांना फळ झाडांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सोनूभाऊ बसवंत महाविद्यालयाचे संचालक गजानन पाटील,भारतीय जनता पक्षाचे नेते तुकाराम भाकरे, तुंगेश्वर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुभाष पाटील, सामाजिक कार्यकर्ते विजय जागरे, हरिश जागरे,राम जागरे,ग्रुप ग्रामपंचायत दहिवलीचे उपसरपंच दत्तात्रय पाटील, मुख्याध्यापक भगवान देसले,दिलीप पाटील,नारायण भोईर,रुपेश मांजे, नितीन भोईर,मनीष व्यापारी,प्रमोद हुमणे उपस्थित होते.

**नियमित वाचा**
**दैं. ठाणे**
**जीवनदीप वार्ता**

# उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानाबाबत आशा वर्कर्सनी महिलांमध्ये जनजागृती करावी : आयुक्त सौरभ राव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महिलांचे आरोग्यमान सुधारावे किंबहुना आजाराचे योग्य वेळी निदान व्हावे यासाठी उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियान ठाणे महापालिकेच्या आरोग्य केंद्रात सुरू आहे. धकाधकीच्या जीवनात महिलांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. आरोग्य ही गुंतवणूक असून वेळच्या वेळी महिलांनी तपासणी करावी यासाठी विविध भागात जाणाऱ्या आशा वर्कर्सने महिलांमध्ये जनजागृती करुन त्यांना या अभियानात सहभागी करावे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले.

ठाणे महापालिकेच्या कासारवडवली येथील रोझा गार्डनिया आरोग्य केंद्रात उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास उपायुक्त उमेश बिरारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, माता व बालसंगोपन




अधिकारी डॉ. वर्षा ससाणे, रोटरी क्लबचे अशोक महाजन, डॉ. अनघा कारखानीस यांच्यासह आरोग्य केंद्रातील परिचारिका, आशा वर्कर्स उपस्थित होत्या.

गर्भाशयाचा कर्करोग हा जगातील दुसरा सर्वसाधारण आढळणारा आजार असून त्यांचे निदान लवकर झाले तरच त्यावर उपाय करणे शक्य होते. आपल्या कुटुंबातील महिला या कायम कुटुंबाकडे लक्ष देताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. बदलत्या जीवनशैलीचे परिणाम हे आपल्या आरोग्यावर होत असतात, त्यामुळे वेळच्या वेळी महिलांनी तपासणी करावी अशा पध्दतीची जनजागृती झोपडपट्टी विभागात करणे आवश्यक असल्याचेही आयुक्तांनी नमूद केले. त्यामुळे आशा वर्कर्सच्या माध्यमातून तसेच महापालिकेच्या आरोग्य केंद्रात तपासणीसाठी येणाऱ्या महिलांसोबत संवाद साधून त्यांना या अभियानात सहभागी होण्यासाठी प्रेरित करण्याच्या सूचना ही त्यांनी वेळी दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 19 जुलै रोजी या अभियानाचा शुभारंभ कोरस आरोग्य केंद्र येथे केला होता. यावेळी 50 महिलांची तपासणी करण्याचे प्रयोजन होते, परंतु पहिल्याच दिवशी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने दोन तासात 269 महिलांची गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी करण्यात आली असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. यापुढे टप्प्याटप्प्याने ठाणे महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रात हे अभियान राबविले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांची विनामूल्य वैद्यकीय तपासणी या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग, ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस, मधुमेह तसेच हिमोग्लोबिन तपासणी तसेच स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत संवाद आदींचा अंतर्भाव या अभियानात असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी नमूद केले. यावेळी आयुक्त सौरभ राव रोझा गार्डनिया या आरोग्य केंद्रातील डायलेसीस सेंटर, अतिदक्षता कक्ष, शस्त्रक्रिया कक्ष आदी पाहणी केली. आरोग्य विभागाच्या माध्यमातून प्रभावीपणे हे अभियान राबविले जात असल्याबाबत आयुक्त सौरभ राव यांनी आरोग्य विभागाचे कौतुक केले.


**प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट**
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



**विवेक सत्संगाने जागत असतो. आणि विवेक आत्म्याला आनंदित करतो. स्वत: देव बनण्याची व दुसऱ्यांना देव बनविण्याची शक्ती आत्म्यात आहे पण ही आत्मशक्ती जागृत करावी लागते. हनुमंत समर्थ होते परंतु जांबुवंताने त्यांना आपल्या शक्तीचे ज्ञान करून दिले; तेव्हाच त्यांना आपले स्वरूप कळले, आपल्या शक्तीचे ज्ञान झाले. त्याचप्रमाणे आत्मशक्ती सद्गुरू मार्गदर्शनाने, सानिध्याने जागृत होते. सद्गुरू शिवाय जीवनात दिव्यता येत नसते.**

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज


## आरोग्य
### कारल्याचे फायदे



पावसाळ्यात गॅस, अपचन आणि पोटदुखीच्या तक्रारी अनेकदा वाढतात. कारल्यामध्ये भरपूर फायबर असते, जे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स पोट स्वच्छ करण्यास मदत करतात.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते**
पावसाळ्यात विषाणूजन्य संसर्ग, सर्दी आणि खोकला हे सामान्य होतात. कारल्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि हंगामी आजारांपासून संरक्षण करतात.

**रक्तातील साखर नियंत्रित करते**
कारल्यामध्ये आढळणारे पॉलीपेप्टाइड-पी आणि चॅरंटीन सारखे घटक रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. पावसाळ्यात जेव्हा हालचाली कमी होतात तेव्हा मधुमेहाच्या रुग्णांसाठी कारल्याचा वापर खूप उपयुक्त ठरू शकतो.
त्वचा आणि केस निरोगी बनवते
पावसाळ्यात त्वचेवर पिंपल्स आणि केसांमध्ये कोंडा येणे ही सामान्य समस्या आहे. कारल्याचे सेवन शरीराला आतून स्वच्छ करते, ज्यामुळे त्वचेला नैसर्गिक चमक मिळते. त्यामुळे टाळूही निरोगी राहते.

**यकृताला डिटॉक्सिफाय करते**
पावसाळ्यात तळलेले अन्न आणि बाहेरचे अन्न खाण्याची सवय यकृतावर परिणाम करते. कारल्यामुळे यकृत विषमुक्त होते आणि त्याचे कार्य सुधारते. शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास देखील ते उपयुक्त आहे.
मलेरिया आणि डेंग्यू रोखण्यासाठी उपयुक्त : पावसाळ्यात मलेरिया आणि डेंग्यू सारख्या डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढतो. कारला नैसर्गिकरित्या रक्त स्वच्छ करते आणि शरीराला आतून बळकटी देते, ज्यामुळे संसर्गाशी लढण्याची शक्ती मिळते.

# चेतनसिंह पवार यांची मुरबाड तालुका ब्लॉक कांग्रेस अध्यक्ष पदी फेरनिवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण :मुरबाड : मुरबाड तालुका ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी इंजि. चेतनसिंह पवार यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सुचनेनुसार प्रदेश उपाध्यक्ष अँड. गणेश पाटील यांनी पुनर्नियुक्ती केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती झाल्यानंतर पक्षाच्या पुनर्बांधणी कार्यक्रमांतर्गत मुरबाड तालुका ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पदाबाबत मुंबई येथील प्रदेश कार्यालयात विविध इच्छुकांच्या मुलाखती झाल्या होत्या परंतु प्रदेशाध्यक्ष व मुलाखत कमिटीने इंजि.चेतनसिंह पवार



यांनाच तालुकाध्यक्षपदी कायम केल्याबाबतचे पत्र ई-मेल द्वारे पाठवले.

सदरील नियुक्त बद्दल प्रदेशाध्यक्ष श्री. हर्षवर्धन सकपाळ, राष्ट्रीय सचिव यू बी व्यंकटेश, प्रदेश कार्याध्यक्ष खा.चंद्रकांत हंडोरे ह्या नेतृत्वाचे व विशेष करून प्रदेश उपाध्यक्ष अँड. गणेश पाटील, प्रदेश सचिव-निरीक्षक गुरुविंदरसिंग बच्चर तसेच जिल्हाध्यक्ष दयानंद चोरगे यांचे आभार चेतनसिंह पवार व्यक्त केले तर मुरबाड तालुक्यातील सर्व ज्येष्ठ नेते आणि सहकारी पदाधिकारी यांच्या मेहनती मुळेच पुनर्नियुक्ती झाल्याचे प्रतिपादन यांनी केले. मुरबाड तालुक्यातील उच्चशिक्षित, सर्वसमावेशक, उत्तम संघटक व सर्वसामान्यांच्या सुखदुःखामध्ये तसेच तालुक्यातील प्रशासकीय प्रश्न सोडवण्यामध्ये हातखंडा असलेले नेतृत्व म्हणून चेतनसिंह पवार यांचा परिचय तालुक्यात आहे त्यामुळे तालुक्यातील विविध भागातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्र भारत गॅस वितरक संघटनेच्या कार्यकारी अध्यक्षपदी महेश तपासे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण शहरात 1980 पासून भारत गॅस वितरण करणाऱ्या गुरुकृपा गॅस कंपनीचे संचालक महेश तपासे यांची महाराष्ट्र भारत गॅस वितरक संघटनेच्या कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तपासे यांच्या या नियुक्तीबद्दल सर्वच स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राष्ट्रीय भारत गॅस वितरक संघटनेचे अध्यक्ष कैलास दुधानी आणि महाराष्ट्राचे अध्यक्ष अविनाश शिंदे यांनी महेश तपासे यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाला किशोर सोडा, अतुल शहा, अरुण वेटेकर, उषा पूनावाला, सरोज अहिरे आणि शिरीष वारंगे आदी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अनुमोदन दिले.

महाराष्ट्रातील गॅसधारकांना वितरकांमार्फत उत्कृष्ट आणि जलद सेवा मिळण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी महेश तपासे यांनी या नियुक्तीवर व्यक्त केली. तसेच कोविड काळात संपूर्ण लॉकडाऊन असतानाही त्यावेळी गॅसवितरकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता गॅसधारकांना सिलेंडर पुरवठा केल्याची आठवणही तपासे यांनी करून दिली.

तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारतील प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत भरीव अशी कामगिरी महाराष्ट्रातील गॅस वितरकांनी केल्याबद्दल देशपातळीवरही या संघटनेचे मोठे कौतुक झाले. महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी भगिनींना सरकारी धोरणानुसार गॅस वितरणचे काम वितरक बांधवांनी मोठ्या उत्साहाने केले आणि त्याचा फायदा लाखो लाडक्या भगिनींना झाल्याचेही ते म्हणाले.

त्याशिवाय गॅस पाईपलाईनमुळे गॅस सिलेंडरला आता फक्त शहरातील अविकसित भाग आणि राज्याचा ग्रामीण भाग येथेच मागणी असून परिणामी वितरक बांधवांसमोर मोठ्या आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. तर आता गॅसधारकांनाही केवायसी सोबतच सिलेंडर घेताना आपला नोंदणीकृत मोबाईलचा ओटीपी संगणक प्रणालीमध्ये नोंद करणे अत्यावश्यक आणि बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्राहकांनी पाच वर्षात एकदा त्यांची रबर ट्यूब बदलावी आणि कायद्याने मान्य असलेली आवश्यक तपासणी वितरकांच्या अधिकृत मेकॅनिककडून करून घ्यावी जेणेकरून अपघात टाळण्यास मदत होईल. गॅस गळतीच्या वेळी ग्राहकांनी काय तात्काळ उपाय करावे यासाठी वेळोवेळी महिलांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजन करणार असल्याचेही महेश तपासे यांनी सांगितले.

## आजचे राशि भविष्य



**मेष**
तुम्ही नवीन जमिनीशी संबंधित कोणताही व्यवहार करणार असाल तर आधी त्याची पूर्ण चौकशी करा. आजचा दिवस आनंददायी जाईल. प्रवासाचा कार्यक्रम होईल.

**वृषभ**
कधीकधी तुमचा उतावीळ आणि आवेगपूर्ण स्वभाव लोकांसाठी समस्या निर्माण करतो. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेताना अनुभवी व्यक्तीचा सल्ला जरूर घ्या.

**मिथुन**
नोकरी करणाऱ्यांना चांगल्या ऑफर मिळण्याची शक्यता आहे, त्यांचा पगार वाढेल. आज निश्चितपणे एकांतात किंवा आध्यात्मिक ठिकाणी थोडा वेळ घालवा.

**कर्क**
प्रलंबित कामे पूर्ण करण्यात तुम्ही लवकरच यशस्वी व्हाल. मुलांकडून आनंद मिळेल.समाजसेवा करणाऱ्या व्यक्तींचा आज स्थानिक लोकांकडून सन्मान केला जाईल.

**सिंह**
तुम्ही घेतलेले निर्णय सकारात्मक आणि फायदेशीर ठरतील. तरुणांनी अभ्यास आणि करिअरवर लक्ष केंद्रित केल्यास योग्य परिणाम मिळतील.

**कन्या**
आरोग्यात काही चढ-उतार होऊ शकतात. व्यायाम आणि खाण्याच्या सवयींकडे लक्ष द्या.कार्य क्षमतेचा वापर केल्यास, वेळेत योग्य उपाय सापडतील. यशाकडे वाटचाल कराल.

**तूळ**
भावांसोबत सुरू असलेला वाद आज कोणाच्या तरी मदतीने मिटतील. तुमचे काम सुरळीतपणे करत राहिल्यास तुमच्यावर जास्त कामाचा ताण पडणार नाही.

**वृश्चिक**
आज ऑफिसमध्ये होणाऱ्या अडचणी काही प्रमाणात कमी होतील. आज तुम्हाला मित्रांकडून पूर्ण मदत मिळेल. तुम्हाला कामाशी संबंधित आव्हानांना सामोरे जावे लागेल .

**धनु**
मुलांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आज त्यांच्यासोबत थोडा वेळ घालवा.खर्च करावा लागेल.तुमच्या वागण्यात काही सुधारणाही कराव्या लागतील.

**मकर**
अनुभवी व्यक्तीच्या सहवासात असाल, जो तुम्हाला चांगले वाटेल. आज तुमचे काही खास काम पूर्ण होतील. काम सुरळीतपणे पार पडेल. दिवस चांगला जाणार आहे.

**कुंभ**
कधीकधी अधिक साध्य करण्याची इच्छा आणि घाईमुळे नुकसान होऊ शकते.तुम्हाला थोड्या मेहनतीने मोठा नफा मिळेल. वडीलधाऱ्यांची सेवा करा .

**मीन**
कामात सुधारणा होईल.तुमचे आरोग्य चांगले राहील. एखाद्या विशिष्ट कामासाठी प्रवासाचा कार्यक्रम बनवता येईल. घरात नातेवाईकांचे आगमन होईल आणि घरात सकारात्मक उर्जा राहील.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!



7775851123, 8108559566
9619188558

# लाचखोरी प्रकरणात केडीएमसीतील तीन अधिकाऱ्यांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** केडीएमसीमध्ये लाचखोरी करणाऱ्या तीन अधिकाऱ्यांना लाचलुचपत विभागाने केलेल्या कारवाईत एकाच दिवशी रंगेहात अटक करण्यात आली आहे. पालिकेचे घनकचरा विभागाचे अधिकारी वसंत देवळूरकर, सुदर्शन जाधव यांना अटक करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी आजारी कर्मचाऱ्याला कामावर रुजू करण्यासाठी 25 हजार रुपयांची मागणी केली होती. लाचलुचपत विभागाने 20 हजारांची लाच घेताना दोन्ही अधिकाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे.

तसेच केडीएमसीच्या सहाय्यक अभियंता रवींद्र आहिरे याला बांधकाम परवानगी देण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाकडून 40 हजार रुपये लाज घेताना रंगेहात अटक करण्यात आली. आतापर्यंत केडीएमसीमधील 47 अधिकारी आणि कर्मचारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात सापडले आहेत.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी २८५ पोलिसांची पद भरतीस गृह विभागाची मंजूरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई येथील अत्यंत बहुचर्चित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी आता २८५ पोलिसांची पदे भरण्यास गृह विभागाने मंजूरी दिली आहे. विमानतळावरील चेकपोस्टसाठी ही पदे असणार आहेत. त्यासाठी १० कोटी १० लाख ८८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे पद भरतीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा सप्टेंबर महिन्यापासून सुरु करण्याची योजना सरकारने आखली आहे. नवी मुंबई विमानतळ पनवेल आणि उलवे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात आहे. या विमानतळासाठी सिडको प्रशासनाने उलवे, गणेशपुरी, तरघर, कोंबडभुजे, वाघीवली गाव, वाघीवली पाडा, वरचे ओवळा, कोपर, कोल्ही, चिंचपाडा येथील गावांच्या जमीनी संपादित केल्या आहेत. या विमानतळामुळे मुंबई महानगरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. हे विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर प्रती वर्षी नऊ कोटी प्रवासी वाहतुकीचे नियोजन आहे. त्यामुळे विमानतळावर सुरक्षा महत्त्वाची ठरते.

विमानतळावरील इमिग्रेशन चेकपोस्टसाठी २८५ पदे नव्याने तयार करण्यास गृह विभाग विचाराधीन होता. अखेर या प्रस्तावास नुकतीच राज्य सरकारीच मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आता २८५ पदांसाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. या पद निर्मिती करिता १० कोटी १० लाख ८८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. यासंदर्भाचा शासन निर्णय देखील प्रसिद्ध झाला आहे.

# विषबाधेमुळे शहापूरमध्ये तीन बहीणींचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूरमध्ये तीन लहान बहीणींचा विषबाधेमुळे मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण कुटुंबात शोकाकूल वातावरण आहे. दरम्यान मुलींच्या मृत्यूप्रकरणी नातेवाईकांनी संशय व्यक्त केला आहे.

अन्नातून विषबाधा झाल्याने तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शहापूर तालुक्यातील आस्नोली येथे घडली. काव्या (10), दिव्या (8) व गार्गी भेरे (5) अशी तीन मुलींची नावे असून त्यांना सोमवारी अन्नातून विषबाधा झाली होती. यापैकी दोघींवर नायर व एकीवर एसएमबीटी येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

याबाबत किन्हवली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पण हा मृत्यू नैसर्गिक नसून घातपात असावा असा संशय मुलींच्या नातेवाईकांनी व्यक्त केला आहे.

शहापुर लगत असलेल्या चेरपोली येथील संदीप भेरे यांची पत्नी संध्या तीन मुलींसह गेल्या आठ महिन्यांपासून तालुक्यातील आस्नोली येथे तिच्या माहेरी राहत होती. सोमवारी 21 जुलै रोजी काव्या, दिव्या व गार्गी या तिघींना पोटदुखी व उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने मुलींच्या आईने आस्नोली येथील खासगी डॉक्टर व नंतर शहापुर उपजिल्हारुग्णालयात दाखल केले. मात्र तिघींची प्रकृती चिंताजनक असल्याने मुंबईच्या नायर व घोटी येथील एसएमबीटी या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

परंतु मृत्यूशी झुंज सुरू असताना त्या तिघींवर काळाने झडप घातली. उपचारादरम्यान यामधील काव्या व गार्गी चा गुरुवारी तर दिव्याचा शुक्रवारी सकाळी दुर्दैवी मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेमुळे तालुक्यात चर्चांना उधाण आले असून तर्कवितर्क केले जात आहेत.

किन्हवली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून नातेवाईकांनी संशय व्यक्त केल्याने शवविच्छेदनाच्या अहवालानंतरच चित्र स्पष्ट होईल अशी माहिती किन्हवली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खैरनार यांनी दिली.

# खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी दिघोडे ग्रामस्थांचे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बातमीदार**

**उरण :** दिघोडे परिसरात मार्गातील खड्ड्यांची दुरुस्ती व नागरिकांची धोकादायक वाहतूक कोंडीतून मुक्तता करा या प्रमुख मागण्यांसाठी शुक्रवारी दिघोडे ग्रामस्थांनी चक्क रस्त्यातील खड्ड्यात बसून आंदोलन केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने खड्डे दुरुस्ती आणि रस्ता रुंदीकरणाचे लेखी आश्वासन दिल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच कीर्तीनिधी ठाकूर यांनी दिली.



अटल सेतू ते दिघोडे फाटा या कोकणात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने त्याचा नागरिक, पर्यटक, विद्यार्थी, रुग्णांना त्रास होत आहे. यामुळे अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवावेत व लवकरात लवकर सदर रस्त्याचे रुंदीकरण करून कॉंक्रीटीकरण करावे या मागणीसाठी दिघोडे गावातील संतप्त नागरिकांनी शुक्रवारी (दि २५) चक्क दिघोडे फाट्यावरील चिखलात रुतलेल्या खड्ड्यामध्ये बसून आंदोलन केले. आंदोलनकर्त्यांनी जवळ जवळ दिड तास चिखलातील खड्ड्यात बसून जनहितार्थ आंदोलन छेडल्याने रस्त्यावर मुंबई व कोकणाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची रांग लागली होती.

आंदोलनाची दखल सार्वजनिक बांधकाम विभाग उरणचे उप अभियंता नरेश पवार, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिघोडे गावचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांना सदर रस्ता खड्डे मुक्त करण्यासाठी तसेच वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेतला जाईल असे लेखी पत्र दिले आहे. आंदोलनात दिघोडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश पाटील, सरपंच किर्तीनीधी ठाकूर, उपसरपंच संदेश दयानंद पाटील, कॉंग्रेस पक्षाचे नेते रामनाथ पंडित, प्रेमनाथ म्हात्रे, माजी सरपंच संकीता संदिप जोशी, अँड निग्रेस पाटील आदीजण सहभागी होते.

# कोपरी पूल आजपासून वाहतुकीसाठी बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे पूर्वेतील सॅटिस प्रकल्पाच्या मार्गिकसाठी ठाणे रेल्वे स्थानकातील पूर्व-पश्चिमेस उभारलेल्या खांबांवर 26 जुलैपासून गर्डर बसवण्यात येणार आहेत. ही मिशन गर्डर मोहीम 3 ऑगस्टपर्यंत सुरू राहणार असल्याने जुना कोपरी पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. ठाणे वाहतूक पोलिसांनी यासंदर्भात अधिसूचना काढली आहे. त्यामुळे कोपरीकरांना 8 दिवस वाहतूककोंडीचे ठरणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन ठाणे वाहतूक विभागाने केले आहे.

ठाणे पूर्व भागातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी ठाणे महापालिकेच्या वतीने सॅटिस पूर्व प्रकल्प राबवण्यात येत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत असून वाहनांची वर्दळदेखील मोठ्या प्रमाणात असते. ठाणे महापालिका आणि रेल्वे अशा दोन्ही यंत्रणा मिळून सॅटिस पूर्व प्रकल्पाचे काम सुरू असून यासाठी तब्बल 260 कोटींचा खर्च केला जाणारा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ठाण्याचा सॅटिस पूर्व प्रकल्प रखडलेला आहे. आता या प्रकल्पातील उड्डाणपुलासाठी रेल्वे रुळाच्या दोन्ही बाजूला खांबांची उभारणी करण्यात आली आहे. मात्र या खांबांवर गर्डर टाकण्याचे काम प्रलंबित होते. काही तांत्रिक कारणांमुळे या कामाला मुहूर्त मिळाला नव्हता. मात्र आता हे काम हाती घेण्यात आले असल्याने जुना कोपरी उड्डाणपूल बंद ठेवण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांच्या वतीने घेण्यात आला आहे.

# सरकारने पालिकेचा निर्णय फिरवला ; शेकडो एकर जमिनी हरित पट्ट्यात वर्ग !

## कल्याण -शीळ येथील कोट्यवधींची गुंतवणूक पाण्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील महापे-शीळच्या सिमेवरील शेकडो एकर हरित पट्ट्यावर नवे नगर वसविण्याचा महापालिका प्रशासनाचा प्रयत्न राज्य सरकारने हाणून पाडला असला तरी यानिमीत्ताने शहरातील राजकीय वर्तुळात मात्र वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. अडीवली, भुतवली, बोरीवली या तीन गावांमधील शेकडो एकर जमिनीत काही ठराविक राजकीय नेत्यांची मोठी गुंतवणुक असल्याची जुनी चर्चा आहे.

नवी मुंबई-डोंबिवली या दोन शहरांना एकमेकांशी जोडणारा महापे-शीळ हा महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी गेल्या काही वर्षात नागरी तसेच व्यावसायीक संकुलांच्या रांगा उभ्या राहील्या आहेत. याच भागात मध्यभागी असलेला हिरवा जंगलपट्टा नागरी संकुलांसाठी खुला करण्याचा प्रयत्न वर्षभरापुर्वी महापालिकेने केला तोच मुळी राजकीय आग्रहापोटी. असे असताना वर्षभरानंतर राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने जवळपास एक हजार एकराचा हा संपूर्ण पट्टा पुन्हा एकदा 'हिरवा' राहील यासाठी मोठे पाउल उचलल्याने या माध्यमातून कोणत्या नेत्याने कोणाचे हिशेब चुकते केले याची



खमंग चर्चा आता सुरु झाली आहे. नवी मुंबई महापालिकेने तयार केलेल्या मुळ विकास आराखड्यात शहरातील महत्वाच्या जमिनी या सार्वजनिक सोयी सुविधांसाठी आरक्षीत रहाव्यात असा महापालिकेचा आग्रह होता. मात्र नगरविकास विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या सिडकोला हे काही मान्य नव्हते. महापालिकेने आरक्षण टाकूनही हजारो कोटी रुपयांच्या या जमिनी विकण्याचा जणू सपाटाच सिडकोने लावला होता. विशेष म्हणजे राज्य सरकारने या काळात बघ्याची भूमीका घेतल्याने महापालिकेला त्याचा फटका बसत होता. याच काळात नवी मुंबई शहराचा विकास आराखडा अंतिम करुन महापालिकेने तो राज्य सरकारला पाठविला होता. त्यामध्ये पाणथळींच्या जागा काही हरित पट्टे खुले करण्यात आल्याने हा आराखडा वादग्रस्त ठरला. मात्र राज्य सरकारने या आराखड्याला अंतिम मंजुरी देताना शीळ-महापे रस्त्यालगतचा जवळपास एक हजार एकराचा हरित पट्टा शाबूत ठेवल्याने नगरविकास विभागाला ही उपरती नेमकी कशी झाली याविषयी आता वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जात आहेत.

महापालिकेने घेतलेल्या निर्णयानुसार महापे-शिळ मार्गावर अतिशय मोक्याच्या ठिकाणी भव्य नागरी आणि वाणिज्य संकुलांना मार्ग प्रशस्त करुन देण्यात आला होता. या जमिनींमध्ये कोट्यवधीची गुंतवणूक असलेल्या नवी मुंबई, ठाण्यातील काही मोठे राजकीय नेते, बिल्डर यांच्या दबावानंतर पालिकेच्या अंतिम विकास आराखड्यात हा आरक्षण बदल करण्यात आल्याची चर्चा होती. नवी मुंबई महापालिका हद्दीत असलेल्या अडवली-भूतवली-बोरिवली या गावांच्या परिसरात एक हजार एकराच्या आसपास जंगलक्षेत्र आहे. हा हरित पट्टा अबाधित ठेवत त्याठिकाणी 'रिजनल पार्क'ची उभारणी करण्याच्या हेतूने महापालिकेने प्रारूप विकास आराखड्यात आरक्षण टाकले होते. मात्र, त्याला या गावांतील काही जमीन मालकांनी आक्षेप घेत हरकती नोंदवल्या होत्या. या हरकती घेणाऱ्यांचा बोलवता धनी कोण याविषयी वेगवेगळ्या चर्चा होत्या.

जंगलपट्टा असूनही गेल्या काही वर्षात नवी मुंबईतील काही राजकीय नेत्यांनी या भागात मोठी गुंतवणुक केली होती. एका बड्या व्यावसायीकाच्या माध्यमातून येथे जमिनींचे मोठे खरेदी चक्र सुरु होते. त्यामुळे विकास आराखड्यात हजारो एकरचा जंगलपट्टा अचानक नागरी संकुलात समाविष्ट झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. राज्य सरकारचा नगरविकास विभाग यासंबंधी कोणता निर्णय घेतो याकडेही सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर महापालिकेचा निर्णय फिरवून सरकारने या जमिनी पुन्हा हरित पट्ट्यात वर्ग केल्याने या भागातील जमिनींची घाऊक विक्रि करणारे राजकीय नेते आणि व्यावसायीक अचडणीत आले आहेत.

अडवली, भुतवली पट्ट्यातील या जमिनी निवासी संकुलांत वर्ग करण्याचा निर्णय होताच नवी मुंबईतील समर्थकांनी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. हा निर्णय शहरातील ठराविक नेत्यांच्या हिताचा ठरु शकतो असे शिंदे यांना पटवून देण्याचा प्रयत्नही करण्यात आला होता. याच काळात नवी मुंबईतील जमिनींची बिल्डरांसाठी आणि ठराविक नेत्यांच्या भल्यासाठी विक्रि केली जात असल्याचा आरोप गणेश नाईक यांनी केला होता. नवी मुंबईच्या जमिनी चोरल्याचा आरोपही नाईक करत होते. मंत्री झाल्यापासून नाईक आणि शिंदे यांच्यातील राजकीय संघर्ष टिपेला पोहचल्याचे चित्र होते.

# भारतीय हवामान खात्याचा पालघर जिल्ह्यासाठी आज 'रेड अलर्ट'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** भारतीय हवामान खात्याने पालघर जिल्ह्यासाठी आज 'ऑरेंज अलर्ट व उद्या (२६ जुलै) अतिवृष्टीचा 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, शाळा आणि महाविद्यालयांना २६ जुलै रोजी सुट्टी जाहीर केली आहे. जिल्ह्यात सध्या अतिवृष्टी सुरू असून येत्या २४ तासांत काही ठिकाणी अत्यंत जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच काही धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे.

सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. आज दुपारपासून तानसा, मोडकसागर आणि मध्य वैतरणा धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. सकाळी ११ वाजता तानसा धरणाचे एकूण २० दरवाजे उघडण्यात आले असून धरणातून सकाळी ११ वाजता २२,१०० क्युसेक आणि दुपारी ३ वाजेपर्यंत २३,२१०.४६ क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. सकाळी ६ ते दुपारी ३ वाजेपर्यंत येथे ७३.०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

मोडकसागर धरण येथून १४,१७८ क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. याच कालावधीत ६५.०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मध्य वैतरणा धरणातून २०१३ क्युसेक पाणी विसर्ग होत आहे. येथे ४८.०० मिलिमीटर पाऊस झाला.

२६ जुलै रोजी पावसाचे प्रमाण वाढून तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे. २७ जुलै रोजी काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज असून २८ जुलैपासून पावसाचे प्रमाण कमी होऊन मध्यम स्वरूपात पाऊस राहील, असे जिल्हा कृषी हवामान केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, कोसबाडने कळवले आहे. नागरिकांनी सतर्क राहावे, आवश्यकता नसल्यास घराबाहेर पडू नये आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.


# कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत,
१ ला मजला, कल्याण - शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ e mail :- apmckalyan@rediffmail.com

## -: जाहिर सुचना :-

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीचे आर्थिक वर्ष २०२५-२०२६ (दि.०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६) सालाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन सनदी लेखापालांची (Chartered Accountant) नेमणुक करावयाची आहे. त्याकरीता सनदी लेखापाल व फर्मस् यांनी समितीचे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दि.२८.०७.२०२५ पासून पुढे ७ दिवसांपर्यंत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत व्यवसाय फी संदर्भात सिलबंद कोटेशन सादर करावयाची आहेत.

**अंतर्गत लेखापरिक्षकांनी करावयाच्या कामांचा तपशिल खालील प्रमाणे**

१) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ (दि.०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६) चे अंतर्गत लेखापरिक्षण करणे व दर तीन महिन्याला अहवाल सादर करणे.
२) सन २०२५-२०२६ सालाचे व्यवसाय कर, ऑनलाईन दरमहा ई पेमेंट करणे, दरमहा रिर्टन फाईल करणे व व्यवसाय करा संबंधीचे काम पहाणे व व्यवसाय कर कार्यालयात सुनावणीस समितीचे वतीने उपस्थित राहून काम पहाणे.
३) सन २०२५-२०२६ सालाचे टीडीएसरिर्टन फाईल करणे.
४) सन २०२५-२०२६ सालाचे समितीचे आयकर रिर्टन फाईल करणे.
५) समितीचे सन २०२५-२०२६ सालाचे समितीचे टॅक्स ऑडिट करणे.
६) सन २०२५-२०२६ दरमहा जीएसटी रिर्टन फाईल करणे, वार्षिक जीएसटी रिर्टन फाईल करणे व जीएसटी टॅक्स ऑडिट करणे.
७) समितीचे अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते वरील आयकर आकारणी करून देणे.
८) समितीचे लेखाशाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना टॅली संगणक प्रणाली करीता मार्गदर्शन करणे.
९) सन २०२५-२०२६ सालात समितीस आयकर, जीएसटी, टी.डी.एस, व्यवसाय कर व इतर कार्यालयाकडून आर्थिक बाबी संदर्भात येणा-या पत्रव्यवहारास मार्गदर्शन करणे व संबंधीत कार्यालयास समितीच्या वतीने उपस्थित राहून काम पहाणे.

सही/- (संजय एगडे) सचिव
सही/- (रविंद्र घोडविंदे) सभापती
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण
जि. ठाणे

* जावक क्रमांक : कृउबास/अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूक/जा. सुचना/ ७१७/२०२५ दि. २५ जुलै २०२५
*जाहिरात आदेश : कृउबास/अंतर्गत लेखापरीक्षक नेमणूक जाहिरात प्रसिद्धी/७१९/२०२५ दि. २५ जुलै २०२५







# वसई-विरार परिवहन बससेवेची दुरवस्था

## तुटलेले हॅन्डल, लोंबकळणारे दरवाजे आणि गादी नसलेल्या आसनांमुळे प्रवाशांमध्ये नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई-विरार महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडून पुरवली जाणारी बससेवेची दुरवस्था झाली आहे. तुटलेले हॅन्डल, लोंबकळणारे दरवाजे आणि गादी नसलेल्या आसनांमुळे महानगरपालिकेच्या अनेक बसेस खिळखिळ्या झाल्या आहेत, ज्यामुळे दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.



वसई विरार शहरात पालिकेच्या परिवहन विभागाकडून बससेवा पुरवली जाते. सद्यस्थितीत पालिकेच्या परिवहन विभागात ११४ बसेस असून ३६ मार्गावर ही सेवा दिली जात आहे. दररोज या बसेस मधून ६० ते ६५ हजार प्रवासी प्रवास करतात. मागच्या काही महिन्यात ४० ई- बस परिवहन विभागाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. मात्र, यापैकी अनेक बसेस अजूनही जुन्या आहेत. यात तुटलेले हॅन्डल, लोंबकळणारे दरवाजे तसेच गाद्या नसलेली आसने यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो. सुसज्ज बससेवा कधी मिळणार असा सवाल आता नागरिक करत आहेत.

खासकरून सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी हा प्रवास अधिकच धोकादायक होत चालला आहे. बसमध्ये आधारासाठी वापरण्यात येणारी हँडल्स तुटलेली असल्यामुळे प्रवासी कोणत्याही आधाराशिवाय अधांतरी प्रवास करतात. अशावेळी तोल जाऊन पडण्याच्या घटना घडल्या आहेत. गर्दीच्या वेळी ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी हा प्रवास अधिक अडचणीचा ठरत आहे. तात्पुरता उपाय म्हणून काही बसमध्ये तुटलेले हँडल्स आणि दरवाजे दोरीने बांधल्याचेही दिसून येत आहे. यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दैनिक जीवनदीप वार्ता



# विरेंद्र म्हात्रे यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : नेरुळ गावचे सुपुत्र व लायन हार्ट ग्रुप नवी मुंबई चे संस्थापक श्री. विरेंद्र यशवंत म्हात्रे ( गुरुभाई ) यांना सामाजिक व उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल यशवंतराव चव्हाण फाऊंडेशन, मुंबई यांच्यावतीने देण्यात येणारा यशवंतराव चव्हाण पुरस्कार जाहीर केला आहे. याबाबतचे निवडपत्र संस्थेचे संस्थापक संजय सावंत यांनी विरेंद्र म्हात्रे यांना पाठवले आहे. विरेंद्र म्हात्रे हे वाढदिवसाच्या निमित्ताने दरवर्षी नेरूळ परिसरात रक्तदानशिबीर, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करतात. त्यांनी दोन वर्षांपूर्वी महापुराच्या काळात कोरोना, जीवनावश्यक वस्तुंचे वाटप केले आहे. अनेक गोरगरीबांना आर्थिक सहकार्य केले आहे. याचीच दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर केला आहे. हा पुरस्कार १० ऑगस्ट रोजी नवी मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

# आई वडील जिवंत असताना त्यांची सेवा करावी हाच खरा आशीर्वाद

## - समाजसेवक राजाभाऊ पातकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आई वडील जीवंत असताना त्याची सेवा करावी, हाच खरा आशीर्वाद असतो , तो आदर्श नव्या पिढीने घेतला पाहिजे असे आवाहन समाजसेवक व वैश्य वाणी समाजाचे उपाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी केले आहे.

पंढरपूर येथे आषाढी एकादशीला संपूर्ण महाराष्ट्रातुन वारकरी संप्रदाय मोठ्या संख्येने सहभागी होत असतो, वारकरी बांधवांची गैरसोय होऊ नये म्हणून वैश्य समाजाच्या वतीने पंढरपूर येथे धर्मशाळा साठी जागा घेण्यात आली आहे,व तेथे आता एकमजली ईमारत बांधण्यात आली आहे.



नुकतीच आषाढी एकादशी पंढरपूर येथे संपन्न झाली, आषाढी एकादशीचे औचित्य साधून पंढरपूर वैश्य समाज धर्मशाळेच्या प्रवेशद्वाराला हभप श्री दत्तात्रय हरिभाऊ पातकर,व सौ मंगला दत्तात्रय पातकर असे नाव देण्यात आले आहे.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथील वैश्य समाज प्रतिष्ठान वतीने ज्ञानेश्वरी पारायण हभप सोनटक्के महाराज यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला, वैश्य समाज धर्मशाळापासून बाळूमामा धर्मशाळा पर्यंत टाळ मृदंग व भजनाच्या गजरात दिंडी काढण्यात आली, मोठ्या संख्येने वारकरी सहभागी झाले होते, तसेच यावेळी समाज सेवक राजाभाऊ पातकर यांनी आई वडीलांना श्री पांडुरंग व रुखमाईचे दर्शन हि घेतले, यावेळी कार्यक्रमाला हभप वैश्य समाज धर्मशाळेचा अध्यक्ष सोनटक्के महाराज, उपाध्यक्ष राजाभाऊ पातकर, चिटणीस गजानन खिसमतराव, सरचिटणीस विजय खिसमतराव, खजिनदार सुधीर रोठे,सह खजिनदार प्रविण दलाल, विश्वस्त मिलींद बिडवी, अमित चौधरी, सल्लागार शशिकांत खिसमतराव, राजेंद्र खिसमतराव,अश्विनी तेलवणे, प्रविण अस्वले उपस्थित होते.

यावेळी समाजसेवक व वैश्य समाजाचे उपाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी सांगितले की आई वडील जीवंत असताना त्याची सेवा केली पाहिजे,ते गेल्यावर नंतर कितीही मोठा सोहळा करा त्याचा काहीच फायदा नाही, जीवंत असताना त्याच्या डोळयासमोर आपण एखाद्या वास्तुला त्याचे नाव दिले तर अधिक समाधान होते आई वडीलांची माया फार वेगळीच असते,त्यामुळे आपण आपल्या आई वडिलांचे नाव दिले आहे व त्याच्या हस्तेच उद्घाटन केले आहे,त्याच्या चेहऱ्यावरील आनंद हेच समाधान वडिलांचे वय ९८आहे तर आईचे वय ८५ आहे, वैश्य समाजाच्या वतीने एक धर्मशाळेची इमारत उभी आहे, जवळपास तीनशे वारकरी बसु शकतात, तसेच नवीन इमारत सहा मजली बांधण्यात येणार आहे तिचे हि काम लवकरच लवकर सुरू करण्यात येणार आहे जवळपास तीन हजार वारकरी संप्रदाय तेथे विसावा घेऊ शकतात तसेच आपण जे पैसे कमवितो त्यातील दहा टक्के रक्कम सामाजिक उपक्रमाना देत असतो त्यामुळे देवहि आपल्या चांगल्या कामाला मदत करतो असे सांगितले,

## नमुना ९
## ( नियम १४ व २४ पहा )
## महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० (२) अन्वये सूचना

ज्याअर्थी तालुका :- अंबरनाथ गाव :- कुशिवली

गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भुमापन व उपविभाग क्रमांक |
|---|---|---|
| 703 | नोंदीचा प्रकार: कुळांची वारस नोंद फेरफाराचा दिनांक: 24/07/2025 माहिती मिळालेचा दिनांक: 21/07/2025 श्री. रमेश रामचंद्र पाटील यांनी अर्ज दिला की, कुळ कै. [धर्मा बुट्या पा. हे दिनांक 30/05/1992 रोजी मयत झाले असुन त्यांना वारस खालीलप्रमाणे :<br>कुळाचा प्रकार :- संरक्षीत कुळ<br>कुळाचे नाव :-<br>लडकुबाई धर्मा पाटील, पत्नी मयत दि. 02/01/1985<br>बाबु धर्मा पाटील, मुलगा मयत दि. 27/09/1994<br>शांतुबाई बाबु पाटील, सुन मयत दि. 01/01/1990<br>बारकुबाई मंगल गायकर, नात<br>शोभा लहु साळवी, नात<br>रामचंद्र बाबु पाटील, नातु मयत दि.01/11/1992<br>हिराबाई रामचंद्र पाटील, नातसुन मयत दि.04/02/2024<br>सुभाष रामचंद्र पाटील, रविंद्र रामचंद्र पाटील, रमेश रामचंद्र पाटील, कांताबाई बाळाराम थळे<br>गजानन बाबु पाटील, नातु मयत दि.27/01/2016<br>इंदुबाई गजानन पाटील, अल्पेश गजानन पाटील, भारती किरण गायकर, भावना चक्रवती पाटील<br>मोहन बाबु पाटील, नातु मयत दि.31/08/2024<br>यमुना मोहन पाटील, महेश मोहन पाटील, करिना राहुल मांगरुळकर<br>पार्वती हरिश्चंद्र म्हात्रे, नात मयत दि. 19/02/2022<br>दिपक हरिचंद्र म्हात्रे, संतोष हरिचंद्र म्हात्रे, सरिता मारुती पाटील, जयश्री कमलाकर पाटील, विश्वनाथ हरिचंद्र म्हात्रे, सोमनाथ हरिचंद्र म्हात्रे<br>गणेश रामचंद्र पाटील पंतु मयत दि.21/03/2008<br>मिनाबाई गणेश पाटील, निलेश गणेश पाटील, नाजुका गणेश भाग्यवंत कुळास वरील वारसाशिवाय अन्य कोणीही वारस नसलेबाबत प्रतिज्ञाप्रत्र, मृत्यु नोंदीचा दाखले पाहिले व जबाबा, पंचनामा प्रमाणे कुळाच्या वारसांची नावे दाखल केली असे. | 88/3 |

आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरून / फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते; आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे. असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे. त्याअर्थी आता मी, प्रविण रावसाहेब नाईकवाडे

ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याव्दारे, उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी **कुशिवली** यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : कुशिवली** **(सही व शिक्का)**
**दिनांकः २४/०७/२०२५** **ग्राम महसूल अधिकारी**

**नाव** **पत्ता** **सही**
**चावडीवर नोटीस प्रदर्शित केल्याची तारीख**

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी जात प्रमाणपत्राची अट शिथिल करा

## : शिक्षक संघाची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या अर्जासाठी ओबीसी सह एस. सी. व एस. टी. चे समंधित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र लागत असते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सर्व कागदपत्रे घेतली जातात पण यापैकी जात प्रमाणपत्र मात्र फॉर्म भरताना लागत असल्याने पालकांची धावपळ होत असे या प्रश्नाबाबत राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात आले होते, व जात प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याची मागणी केली होती. यावेळी संबंधित सचिवांनी केंद्रीय मानव संसाधन मंत्री यांच्याकडे विनंती करू असे आश्वासन दिले होते. आज तसे पत्र सर्व नवोदय विद्यालयाच्या रिजनल ऑफिस ला प्राप्त झाले आहे. पण यामध्ये फक्त ओबीसी चा उल्लेख असल्याने सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हितासाठी ओबीसी सह एससी व एसटीच्या ही जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व सर्वांना समान न्याय द्यावा अशी विनंती संघटनेच्या वतीने करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल नाचपले यांनी सांगितले

# मुंबई वडोदरा महामार्गाला सरकारकडून १६० कोटींची मंजुरी - खा.सुरेश म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : केंद्र शासनाचा महत्वाचा प्रकल्प असलेला मुंबई वडोदरा महामार्ग भिवंडी वाडा रस्त्यामधून जात असून भिवंडीतील लामज सुपेगाव येथे या महामार्गाला जोड देण्याची मागणी भिवंडी लोकसभेचे खा.सुरेश (बाळा मामा) म्हात्रे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती.

या मागणीची दखल केंद्रीय मंत्री गडकरी यांनी घेतली असून या जोडणी प्रकल्पासाठी सुमारे १६० कोटी रुपयांची निधी मंजूर करण्यात आला असून प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती खा.म्हात्रे यांनी दिली.

भिवंडी-वाडा हा राष्ट्रीय महामार्ग औद्योगिक, व्यापारी आणि शेती क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा असून या महामार्गावरून मुंबई वडोदरा महामार्ग जाऊनही या मार्गावर



थेट प्रवेश नसल्याने प्रवाशांना वाहतूक वळसा घालून तब्बल १८ किमीचा अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे, यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक नुकसान होणार असून स्थानिक नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.त्यामुळे भिवंडी-वाडा मार्गावर लामज सुपेगाव गावाजवळून मुंबई वडोदरा महामार्गावर थेट प्रवेशद्वार निर्माण करावे,रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व दुरुस्ती करून अत्याधुनिक वाहतूक सुविधा निर्माण करावी.

नवीन इंटरचेंज तयार करून भिवंडी-वाडा मार्ग थेट एक्स्प्रेसवेने जोडावा, यामुळे वाहतूक वेगवान होईल आणि स्थानिकांसाठी सहज उपलब्धता निर्माण होणार असून त्यामुळे भिवंडी-वाडा औद्योगिक पट्टा वेगाने विकसित होऊन ५ हजारहून अधिक नवीन रोजगार संधी निर्माण होऊन स्थानिक तरुण आणि कामगारांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.

येथील नागरिक,शेतकरी व प्रवाशांसह भिवंडीच्या विकासासाठी हा प्रकल्प महत्वाचा दुवा ठरणार असून या प्रकल्पामुळे भिवंडी-वाडा परिसराचा विकास झपाट्याने होणार असल्याने खा.म्हात्रे यांनी मंत्री गडकरी भेट घेतली.महामार्ग जोडणी बाबत केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून त्यासाठी सुमारे १६० कोटींचा निधी देखील मंजूर करण्यात आला असून प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची माहिती खा.सुरेश म्हात्रे यांनी दिली.

# जीवनदीप महाविद्यालयात रेड रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : सदर रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत एकूण-21 महाविद्यालयांनी सहभाग नोंदवाला यामध्ये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली येथे आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, सिव्हिल हॉस्पिटल ठाणे यांच्या वतीने आणि जिवनदीप शिक्षण संस्था संचालित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली यांच्या सौजन्याने रेड रन स्पर्धेचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले.



या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. रवींद्र घोडविंदे आणि ग्रामीण रुग्णालय गोवेली येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपलक्ष्मी मेश्राम यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये 21 महाविद्यालयांतील 200 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मुला आणि मुलींसाठी स्वतंत्र गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आरोग्य, शिस्त, आणि सामाजिक जागरूकतेचा सुंदर संगम घडवून आणला.

विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे:

मुलांचा गट:

1. हरिओम सिंग – S.S.T. College
2. विशाल कनोजिया – S.S.T. College
3. हरिओम मौर्य – B.K. Birla College (Night)

मुलींचा गट:

1. सुजाता मुंडेकर – S.S.T. College, उल्हासनगर
2. अंकिता डी. Pal– S.S.T. College, उल्हासनगर
3. धनश्री व्ही. पडवळ – V.P.M. College, किनवली

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापकवर्ग, स्वयंसेवक तसेच जिल्हा एड्स नियंत्रण विभाग, ठाणे यांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाचा उद्देश केवळ स्पर्धा नव्हे, तर HIV/ AIDS विषयी जनजागृती, आरोग्य विषयक साक्षरता आणि युवकांमध्ये सकारात्मक विचारांची बीजे पेरणे हा होता.

# पत्रकार अर्जुन चेमटे यांना मातृशोक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : पत्रकार, शिक्षक अर्जुन कुंडलिक चेमटे यांच्या संयमशील वृत्ती, दयाळु स्वभाव आणि लोकसेवेची भावना असलेल्या मातोश्री कै.सुभद्राबाई कुंडलिक चेमटे (वय 70 वर्ष ) यांनी मंगळवार दिनांक 22 जुलै 2025 सायं. 6.15 वाजता अखेरचा श्वास सोडला. त्यांचे पश्चात कुंडलिक उमाजी चेमटे (पती ), अर्जुन चेमटे (मुलगा), कल्पना गर्कळ, सिंधु बोडखे, अंजना आंधळे (मुली ) असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिवार, नातेवाईक, तसेच सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

त्यांच्यावर शिंगोरी ता. शेवगाव जि. अ. नगर येथे दि.23 जुलै 2025 रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी रेल्वे बोर्डाचे सदस्य धनराज गुट्टे, गजानन आंधळे, संदिप चकोर, प्रविण खाडे, निखिल घुगे, लक्ष्मण इलग, राकेश तोमर, संदिप बोडखे, काशिनाथ चेमटे, प्रभाकर चेमटे, ज्ञानदेव चेमटे सह नातेवाईक, गावकरी यांनी श्रद्धांजली वाहिली. कै.सुभद्रा कुंडलिक चेमटे यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक अमूल्य क्षण हृदयापासून आपले कुटुंब व समाजहितासाठी समर्पित केले. एक गृहीनी म्हणून काम करताना घरातील मुलांना संस्कार देऊन त्यांचे जीवन उन्नत केले. त्यांनी आपल्या कुटुंबाशी नितांत निष्ठा दाखवली. त्यांच्या सहवासातून घरात प्रेम, आदर आणि समरसतेची वातावरण निर्माण झाले. त्यांच्या असामान्य सहकार्यामुळे गावात/ समाजात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ज्योत कायम तेवत राहिल.

दि.31 जुलै 2025 रोजी दशक्रिया विधी तर दि.03 ऑगस्ट 2025 रोजी तेरावा विधी शिंगोरी ता. शेवगाव येथे होणार आहे. दशक्रिया विधीचे दिवशी त्यांचे आत्म्यांस शांती मिळावी म्हणून गोविंदगड संस्थान, हातोला येथील ह.भ.प. महंत अशोक महाराज शास्त्री यांची प्रवचन सेवा केली जाणार आहे.

## देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

# खर्डीत रक्तदान शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहापूर तालुक्यातील भाजपच्या उत्तर मंडळ विभागाच्यावतीने खर्डी येथील अनुराग मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात 55 बाटल्या रक्ताच्या बाटल्या जमा करण्यात आल्या. यावेळी रक्तदात्याना प्रमाणपत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांना यावेळी शहापुरचे विधानसभा निवडणुक प्रमुख अशोक इरणक यांनी सांगितले व या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी भाजपचे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष हरीश निचिते,ओबीसी सेलचे माजी जिल्हाध्यक्ष रविंद्र चंदे,माजी सभापती गजानन गोरे,शहापूर ग्रामीण उत्तर मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सांडे,खर्डी भाजप शहरप्रमुख विजय परदेशी,सोशल मीडियाचे ओंकार सारंगधर,अनुराग हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.मकरंद काळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.



## मुरबाड तालुका खरेदी विक्री संघाकडून

# शेतकऱ्यांच्या रखडलेल्या भाताचे पैसे जमा होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुका खरेदी विक्री संघावर प्रशासक हटवून आमदार किसन कथोरेंच्या वदरहस्ताने प्रशासकीय संचालक मंडळाची नेमणूक केली आहे.त्या दिवसा पासुन चेअरमन संतोष पवार व त्यांचे सर्व सहकारी शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेताना दिसत आहेत.

सन 2024 -25 मध्ये एकुण 4615 शेतकऱ्यांनी संघामध्ये भात दिले होते. यापैकी इतर बहुतेक शेतकऱ्यांना भाताचे पैसे त्यांच्या खात्यावर जमा झाले होते मात्र ,यामधील 141 शेतकरी काही तांत्रिक अडचणी मुळे वंचित राहिले होते. तथापी चेअरमन संतोष पवार यांनी ही बाब आमदार किसन कथोरेंच्या लक्षात आणुन देताच त्यांनी शासन स्तरावर प्रयत्न करून त्या 141 शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत येत्या दोन दिवसात पैसे मिळणार असल्याची माहिती संतोष पवार यांनी दिली. त्याच बरोबर यावर्षीचा बोनससाठी पात्र असणार्या 7728 शेतकऱ्यांपैकी 4439 शेतकऱ्यांना बोनसचे पैसे मिळाले आहेत तर उर्वरित शेतकऱ्यांचे शासन निर्णया नुसार येत्या दहा ते बारा दिवसात बँक खात्यात जमा होणार असल्याचे सांगितले.तर 2020 -21 मधील 500 शेतकऱ्यांपैकी 17 शेतकरी हे मयत झाले असून त्यांच्या वारसांनी लागणारी आवश्यक कागदपत्रे खरेदी विक्री संघाकडे जमा करावीत असे आवाहन त्यांनी केले आहे.





भाजपाचे विद्यमान आमदार किसन कथोरे यांनी खरेदी विक्री संघावर लक्ष दिल्या पासून तालुक्यातील शेतकऱ्यांना खर्या अर्थाने न्याय मिळत असल्याची भावना चेअरमन संतोष पवार व सर्व संचालक मंडळ यांनी व्यक्त केली असून आमदार किसन कथोरेंचे त्यांनी आभार मानले आहेत.




Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.